<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.: १०७/२०१९</u>
<u>निशाणी क्र.: ०३/क</u>

## आदित्य घ. नाईक, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा यांचे न्यायालय
## आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १. अपराधाची दिनांक | : | ०६.०६.२०१८ |
| २. तक्रारीची दिनांक | : | ०६.०६.२०१८ |
| ३. फिर्यादीचे नांव, वय व पत्ता | : | ज्ञानेश्वर मिठाराम पाटील,<br>वय– ३५ वर्ष, धंदा– शेती,<br>रा. रहीमपुरे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |
| ४. आरोपीचे नांव, वय व पत्ता | : | प्रमोद लोटन पाटील,<br>वय– ३३ वर्ष, धंदा– चालक<br>रा. साळवे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |
| ५. अपराधाचा तपशील | : | |

सुरुवातीस दिनांक ०६/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारांस दोंडाईचा ते सोनगीर मार्गावर संतोष पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर तुम्ही तुमचे ताब्यातील ४०७ वाहन क्र. एम.एच.–१८–एम.–३५४९ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने हलगर्जीपणाने चालवून सदोष मनुष्यवध या सदरात न मोडणारी बेदरकार किंवा हयगयीची कृती करुन फिर्यादीचा भाऊ यशवंत मिठाराम पाटील याच्या मृत्युस कारण झालात आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४–अ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

२. दुस–यांदा, वरील ठिकाणी, वेळी व तारखेस तुम्ही मानवी जिव धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावरुन तुमच्या

ताब्यातील ४०७ वाहन नोंदणी क्र. एम.एच.–१८–एम.–३५४९ हाकलेत आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला असून ह्या गुन्ह्याची मी नोंद घेतली आहे.

३. तिस–यांदा, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही फिर्यादीचा भाऊ यशवंत मिठाराम पाटील व साक्षीदार जगन विक्रम पाटील यांच्या मोटारसायकलीस धडक देवुन त्यांचे जीवितास धोका निर्माण होणाऱ्या किंवा त्यांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने त्यांना किरकोळ दुखापत पोहचविली आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधानाचे ३३७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

४. चौथ्यांदा, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही फिर्यादीचा भाऊ यशवंत मिठाराम पाटील व साक्षीदार जगन विक्रम पाटील यांच्या मोटारसायकलीस धडक देवुन त्यांचे जीवितास धोका निर्माण होणाऱ्या किंवा त्यांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने त्यांना गंभीर दुखापत पोहचविली आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधानाचे ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

५. पाचव्यांदा, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही फिर्यादीचा भाऊ यांची मोटारसायकल क्रमांक एम.एच.–१८–ए.एल.–३९९२ यांना अपाय केला आणि त्यायोगे रुपये ५०/– किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची हानी किंवा नुकसान घडवून आणले आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ४२७ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

६. सहाव्यांदा, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यात वर नमूद वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालविले आणि त्यायोगे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे

७. सातव्यांदा, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही सदर अपघातातील दुखापतीस वैद्यकीय उपचारासाठी मदत न करता पळून गेले आणि त्यायोगे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम १३४/१७७ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

८. शेवटी, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही सदर ४०७ वाहन क्र. एम.एच.–१८–एम.–३५४९ चे विमा पॉलिसी काढलेली नाही आणि त्यायोगे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १४६ चा भंग करुन कलम १९६ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

वरील सर्व अपरांधाकरीता मी दखल घेतली आहे आणि याद्वारे मी असे निर्देश देतो की, तुमच्या विरुद्ध वरील आरोपान्वये खटला चालविण्यात यावा.

समक्ष

सही/–

दि. ०३/०७/२०२४

(आदित्य घ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
दोंडाईचा

वरील पर्टीकुलर मधील मजकूर हा आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याचे म्हणणे खाली नोंदविण्यात आलेले आहे.

सही/–

दि. ०३/०७/२०२४

(आदित्य घ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
दोंडाईचा

६. **आरोपीचे प्रतिकथन** :

अ) : तुम्हाला फिर्यादीच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

ब) : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला अपराधाचा तपशिल कळला काय ?

उत्तर : होय.

क) : तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उत्तर : नाही.

ड) : तुम्हाला सरकारी खर्चाने वकील हवा आहे का ?

उत्तर : नाही.

आरोपीची स्वाक्षरी/अंगठा

समक्ष

सही/-

दि. ०३/०७/२०२४

(आदित्य जी. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
दोंडाईचा